# बृहन्मुंबई महानगरपालिका

## सार्वजनिक आरोग्य खाते

## मुरली देवरा महानगरपालिका नेत्र रुग्णालय

मौलाना शौकत अली रोड, दुर्गादेवी उद्यानासमोर, मुंबई-४०००0८.

क्र.आअ/ 668 /मुदेमनेरु दि. 22.07.2025

## <u>जाहिरात</u>

मुरली देवरा महानगरपालिका नेत्र रुग्णालय या आस्थापनेवरील '**वैद्यकीय अधिकारी** ' संवर्गाचे ०१ अनुसूचित पद कंत्राटी तत्वावर भरण्यासाठी जाहिरतीद्वारे अर्ज मागविण्यात येत आहेत.

मुरली देवरा महानगरपालिका नेत्र रुग्णालय हे डोळ्यांशी संबंधित आजार असलेल्या रुग्णांना उपचार देण्यासाठी एक विशेष रुग्णालय आहे. माननीय महानगरपालिका आयुक्तांच्या दिनांक २६.०६.२०२५ रोजीच्या मंजुरीनुसार, खाली नमुद केलेल्या शैक्षणिक अर्हता,अनुभव,मासिक मानधन व विहीत अटी आणि शर्तीसह अर्ज मागविण्यात येत आहेत.

**<u>पदांचा तपशील</u>**

**(पदाचा कार्यकाल: १६.०८.२०२५ ते ३१.०३.२०२७)**

**(कंत्राटी तत्वावर दर १७९ दिवसांनी १ दिवसाचा तांत्रिक खंड)**

| पदनाम | संख्या | शैक्षणिक अर्हता | निश्चित वेतन |
|---|---|---|---|
| वैद्यकीय अधिकारी | १ | • वैधानिक विद्यापीठाची औषधशास्त्र व शल्यचिकित्सा शास्त्र पदवी (MBBS) मान्यताप्राप्त विद्यापीठ/ संस्थेची DOMS पदव्युत्तर पदविका<br>**अथवा**<br>• मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी .<br>• MS (OPTHAL)/ DNB (OPTHAL) असल्यास प्राधान्य.<br>• पदव्युत्तर पदविका अथवा पदव्युत्तर पदवी नंतर किमान २ वर्ष अनुभव | रु.९०,०००/- दरमहा |

**अर्ज प्रक्रिया :**

अर्ज स्वीकारण्याचे ठिकाण व दिनांक - **मुरली देवरा महानगरपालिका नेत्र रुग्णालय, कार्यालय, सहावा मजला** दि.२२.०७.२०२५ ते दि.०१.०८.२०२५ सोमवार ते शुक्रवार (सार्वजनिक सुट्ट्या वगळून) सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत

**<u>प्रमाणपत्रे</u> :-**

१) एमएस/डीएनबी (नेत्ररोग) पदवी ,पदविका, MSCIT व इतर उत्तीर्ण प्रमाणपत्रे, गुणपत्रिका
२) वैध एमएमसी नोंदणी प्रमाणपत्र, नूतनीकरण प्रमाणपत्र
३) अनुभव प्रमाणपत्र
४) आधार कार्ड आणि पॅन कार्डची प्रत
५) छायाचित्र (Photo of candidate)

**<u>कर्तव्यसूची:</u> -**

१) बाह्यरुग्ण विभाग, आंतररुग्ण विभाग, शस्त्रक्रिया विभाग तसेच इतर विभाग सांभाळणे.
२) रूग्णालयाच्या आंतरविभागात फेरी मारणे, रूग्णालय व्यवस्थित चालले आहे का पाहणे आणि अतिआवश्यक काम पहाणे
३) रुग्ण आणि नातेवाईक यांच्या तक्रारीकडे लक्ष देणे.
४) आंतर विभाग भंडार, दवाखाना, साधारण भंडार तपासणे.
५) गरजेच्या रुग्णांना दुसऱ्या रूग्णालयात हलविण्याची व्यवस्था करणे.
६) प्रमुख वैद्यकिय अधिकाऱ्यांच्या कामात दररोज मदत करणे आणि प्रमुख वैद्यकिय अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीमध्ये कामाची देखभाल करणे.

क्रमश:

**अटी व शर्ती :**

१.उमेदवारांकडे महाराष्ट्र त वैद्यकीय परीषद यांची मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी/ पदवीका (PG Degree/ PG Diploma) तसेच त्यांचे नोंदणीकरण किंवा नोंदणीकरणाचे नुतनीकरण बंधनकारक आहे.

२.उमेदवाराने संगणकाचे ज्ञान अवगत करणे आवश्यक आहे. त्याने/तिने डी.ओ.ई.ए.सी.सी. सोसायटीचे (सी.सी.सी.) किंवा (ओ स्तर) किंवा (ए स्तर) किंवा (बी स्तर) किंवा (सी स्तर) स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिकी शिक्षण मंडळाचे एम.एस.आय.टी. किंवा जी.ई.सी.टी. चे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे.

३.उमेदवार महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची शालांत परीक्षा वा तत्सम किंवा उच्चतम परिक्षेत किमान १०० गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय घेऊन उत्तीर्ण असावा.

४.उमेदवारांची पदावरिल नियुक्ती भविष्यात कोणत्याही परिस्थितीमध्ये नियमित करण्यात येणार नाही.

५.उमेदवारांची कंत्राटी तत्वावरची नियुक्ती आवश्यकता नसल्यास कुठल्याही क्षणी संपुष्टात आणण्यात येईल.

६.उमेदवारांची कंत्राटी तत्वावरची नियुक्ती ही नियमित तत्वावरिल नियुक्तीकरिता ग्राहय धरण्यात येणार नाही.

७.उमेदवारांच्या नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी पदधारकाने चुकीची माहीती प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्याने किंवा कोणतीही माहीती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची नियुक्ती रद्दबादल करण्यात येईल.

८.नियुक्तीच्या वेळी ५०० रुपयांच्या बॉन्ड पेपरावर विहित नमुन्यातील कंत्राट करार करुन संबंधीत आस्थापनेस १५ दिवसाच्या आत सादर करणे आवश्यक राहील अन्यथा त्याची नियुक्ती रद्दबादल करण्यात येईल.

९.उमेदवाराच्या कंत्राटी तत्वावरिल नेमणूकीनंतर त्रैमासिक अनुपालन अहवाल (performance report) जसे की दैनंदीन उपस्थिती दिलेल्या सेवेचा संख्यात्मक व गुणात्मक अहवाल यानुसार क्रंत्राटी सेवा पुढे चालू ठेवण्यात येईल.

१०.सदर कंत्राटी तत्वावरिल पदधारकाने नियुक्ती कालावधीत शिस्तभंग केल्याचे निदर्शनास आल्यास त्याची नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.

११.उमेदवारांला कुठल्याही कारणास्तव पदधारकास पदाचा राजीनामा दयावयाचा असल्यास त्याने एक महिना आधी पुर्वसूचना देणे बंधनकारक आहे.

१२.पदधारकाने या पदाचे आदेश प्राप्त झाल्यावर सात दिवसाच्या आत त्वरित कर्तव्यार्थ हजर राहावे लागेल अन्यथा सदर पदाच्या नियुक्तीकरिता आपणास स्वारस्य नसल्याचे समजून पुढिल उमेदवाराची नियुक्ती करण्यात येईल.

१३.प्रमुख वैद्यकिय अधिकारी यांना गरजेनुसार उमेदवारांच्या कर्तव्य व जबाबदा-या निर्धारित करण्याचे व वेळोवेळी सुधारणा करण्याचे पुर्ण अधिकार असतील व उमेदवाराला त्याप्रमाणे सेवा देणे बंधनकारक असेल.

१४.उमेदवारांची नेमणूक प्रथमत: तात्पुरत्या स्वरुपात १७९ दिवसांसाठीकरिता असेल. उमेदवारांचे काम समाधानकारक असल्यास एक दिवसांचा तांत्रिक खंड देऊन कंत्राटी तत्वावर पुर्ननियुक्ती करण्यात येईल.

१५.पात्र उमेदवारांची नियुक्ती न झाल्यास त्यांची प्रतिक्षायादी तयार करुन सदर प्रतिक्षायादी दोन वर्षाच्या कालावधी करता ग्राह्य धरण्यात येईल व नियुक्त झालेला कंत्राटी उमेदवारांनी राजीनामा दिल्यास, सेवा सोडुन गेल्यास अथवा विहित वेळेत रुजु न झाल्यास यादीमध्ये उपलब्ध असलेल्या पुढील उमेदवारास नियुक्त करण्यास येईल.

१६.क्र.एचओ/28275/लेखा. दि.07.02.2025 (सार्वजनिक आरोग्य खात्याच्या अखत्यारीतील संकीर्ण शुल्का बाबत) नुसार उमेदवारांकडुन रु.७९०+१८% GST रु.१४३= रु.९३३/- एकूण शुल्क अर्जासाठी आकारण्यात येईल. कार्यालयातून चलन घेऊन अर्जाचे शुल्क महानगरपालिकेच्या नागरी सुविधा केंद्रात (CFC) रोखीत भरावे व शुल्क भरल्याची पावती विहीत कालावधीत सादर करावी.

१७.उमेदवारास साप्ताहिक रजा व दर सहा महिन्यांना ७ १/२ नैमित्तीक रजा अनुज्ञेय असतील. या व्यतिरिक्त इतर कोणतीही रजा अनुज्ञेय असणार नाही.

१८.उमेदवारास कोणत्याही न्यायालयाने नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरूपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास, तसेच उमेदवाराविरूद्ध पोलिस चौकशी/ न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास/ शिक्षा झालेली असल्यास उमेदवाराने त्याबाबत माहिती देणे आवश्यक आहे.

**सही /-**

**प्रमुख वैद्यकिय अधिकारी**

**मुरली देवरा महानगरपालिका नेत्र रूग्णालय**